Peer Reviewed Referred and UGC Li...
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINA...
QUARTERLY RESEARCH JOURNAL

AJANTA



Smt. Sindhutai Jadhav Maha Mehkar 330

Volume-VIII, Issue-I
January - March - 20..
Marathi Part - V

Ajanta Prakashan

...CT FACTOR / INDEX...
2018 - 5.5
www.sjifactor.com

Scanned by TapScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

CONTENTS OF MARATHI PART - V

अ.क्र.	लेख आणि लेखकाचे नाव	पृष्ठ क्र.
१	भारतीय शेतकऱ्यांच्या आंदोलनातील शेतकरी संघटनेचे योगदान **डॉ. पुरूषोत्तम सं. माहोरे**	१-५
२	शाश्वत शेतीतून पर्यावरण संतुलन **प्राचार्य डॉ. संजय धनवटे**	६-९
३	भारतीय शेतकऱ्यांच्या भौगोलीक, सामाजीक व आर्थिक समस्यांचे चिकीत्सक अध्ययन **प्रा. निखिल एम. देशमुख**	१०-१३
४	आपत्ती व्यवस्थापन आणि शेती **डॉ. दत्तात्रय रा. धुमाळे**	१४-१८
५	शेतकरी संघटनाच्या चळवळी व आंदोलने **प्रा. डॉ. बी. एम. नरवाडे**	१९-२४
६	भारतीय शेतीचा इतिहास **प्रा. डॉ. नीता तिवारी**	२५-२९
७	नागरिकरणाचा शेती व्यवसायावरील परिणाम **प्रा. सुधीर लुंगे**	३०-३४
८	शेतकरी महिलांच्या सामाजिक विकासास सहाय्यक योजना **डॉ. मधुकर दलपतराव वडते**	३५-३८
९	कृषीमुल्य व भारतीय शेती **प्रा. डॉ. राजेंद्र एन. बोरसे**	३९-४१
१०	विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे, परिणाम व उपाय **प्रा. डॉ. मेघराज आर. शिंदे**	४२-४७
११	विदर्भातील सिंचन आणि अनुशेषाचे राजकारण **प्रा. डॉ. आर. जी. सुरळकर**	४८-५५
१२	ग्रामीण कवितेतून व्यक्त झालेले शेतकरी जीवनाचे वास्तव **प्रा. डॉ. प्रमोद दामोदर देवके**	५६-५९
१३	शेतकऱ्यांच्या समस्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन **प्रा. अमरिष एस. गावडे**	६०-६५

Smt. Sindhutai Jadhav Mahila Mohkar 330

Scanned by TapScanner

११. विदर्भातील सिंचन आणि अनुशेषाचे राजकारण

प्रा. डॉ. आर. जी. सुरळकर
श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर.

अनुशेषामुळे एक प्रदेश विकासाच्या प्रक्रियेत मागे पडतो. २०१६ नुसार विदर्भातील सिंचनाची परिस्थिती खालीलप्रमाणे आहे.

प्रादेशिक असमतोल दांडेकर समिती

१९८२ मध्ये सिंचन अनुशेष निश्चित केला. हा अनुशेष काढताना सिंचन क्षमतेचा आधार घेतला. हा अनुशेष काढतांना एकुण पीका खालील क्षेत्राच्या तुलनेत किती सिंचन क्षमता निर्माण झाली या आधारे सरासरी काढून ज्या जिल्हयाची सिंचन क्षमता आहे. ते जिल्हे अनुशेष जिल्हे ठरविले. या आधारे राज्याची सिंचनाची सरासरी २२.५५ टक्के होती. ज्या जिल्हयात सरासरीपेक्षा कमी सिंचन क्षमता निर्माण झाली. अशा जिल्हयाचा अनुशेष काढण्यात आला. मराठवाडा, कोकण, नाशिक, धुळे, या जिल्हयाचा अनुशेष काढण्यात आला. विदर्भाचा अनुशेष ५ लाख २७ हजार ३१० हेक्टर होता.

विभागवार सिंचन अनुशेष

वर्ष	राज्य सरासरी	एकुण राज्याचा अनुशेष	कोकण विभाग	नाशिक विभाग	पुणे विभाग	उर्वरीत महाराष्ट्र	मराठवाडा विभाग	अमरावती विभाग	नागपूर विभाग	विदर्भाचा अनुशेष
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११
१९८२	२२.५५	९२४.२९	१०५.५८	३०.७३	०.००	१३६.३१	२६०.६७	४१६.८७	११०.४४	५२७.३१
	टक्केवारी	१००	११.४२	३.३२	०.००	१४.७५	२८.२०	४५.१०	११.९५	५७.०५
	३५.११	१३८३.२४	७६.६९	९१.२०	०.००	१६७.८९	४३०.६४	६८५.६७	९९.०४	७८४.७१
१९९४	टक्केवारी	१००	५.५४	६.५९	०.००	१२.१४	३१.१३	४९.५७	७.१६	५६.७३
२०१३	५६.६२	१५५९.४८	६८.७१	७३.३१	०.००	१४२.०२	४२९.६७	८७९.१२	११८.६८	९९७.८०
	टक्केवारी	१००	४.३८	४.६७	०.००	९.०५	२७.३८	५६.०१	७.५६	६३.५८

विदर्भविकास मंडळ वार्षिक अहवाल २०१६

निर्देशांक अनुशेष समिती :- १९९४ मध्ये निर्देशांक अनुशेष समितीने जिल्हयाच्या आधारे सिंचनाचा अनुशेष स्पष्ट केला. हा अनुशेष निश्चित करतांना दांडेकर समितीचा वापर करण्यात आला. १९९४ वर आधारित राज्याची सरासरी ३५.११ टक्के होती. या सरासरीच्या आधारे विभागवार सिंचनाचा अनुशेष निश्चित केला. यामध्ये एकुण अनुशेष १३ लाख ८३ हजार

Scanned by TapScanner

२०० हेक्टर होता. तर विदर्भाचा अनुशेष ७,८४,७०० होता. या मध्ये पुणे जिल्हयाचा सिंचनाचा अनुशेष कधीच आढळून आला नाही.

महाराष्ट्रातील जलसंपत्ती नियमन :- २००५ मध्ये जलसंपत्ती नियमन कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार जिल्हयाद्वारे नविन अनुशेष निश्चित करण्यात आला. सिंचन अनुशेषाची जिल्हयाची माहिती या कायद्याने दिली. या समितीने विदर्भाचा अनुशेष सतत वाढत आहे असे स्पष्ट केले. महाराष्ट्रात अमरावती विभागातील अकोला वाशिम,बुलडाणा अमरावतीत या जिल्हयात १९९४ चा २,२१,६८० हेक्टरचा अनुशेष शिल्लक आहे. यावरून असे स्पष्ट होते की, राज्याच्या काही भागाचा सिंचनाचा अनुशेष सारखा नाही.

प्रकल्प उभारणीतील अडथळे :- विदर्भात गोदावरी, तापी नदीच्या खोऱ्यात भरपूर पाणी आहे. त्यामुळे सिंचनाचे क्षेत्र वाढू शकते परंतु वास्तवात ते क्षेत्र ३० टक्के आहे. त्यामुळे सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. या प्रकल्पातील पाण्याचे व्यवस्थापन झालेले नाही त्यामुळे सिंचनाची समस्या निर्माण झाली आहे.

अनुशेष निर्देशांक समितीच्या अहवालाचा स्विकार :- शासनाने अनुशेष व निर्देशांक समितीचा अहवाल २००० मध्ये स्विकारला. या अहवालाला मान्यता देण्याचे ठरले. तरी देखील सिंचन अनुशेष वाढत चालला आहे.

नदीजोड प्रकल्प अनुशेष :- अमरावती विभागात पाण्याची कमतरता आहे. राज्यपालांनी अमरावती विभागात पाणी उपलब्ध होण्यासाठी २००९ मध्ये तापी खोऱ्यातील पाणी मागणीचा प्रस्ताव सुचविला होता. या प्रस्तावाबाबत फारसी दखल घेतली नाही. त्यामुळे अमरावती जिल्हयाला पाणी मिळाले नाही. तसेच पुर्व विदर्भात अतिरिक्त पाणी आहे.हे पाणी नदीजोड प्रकल्पाद्वारे अमरवती विभागात जोडण्याचा प्रस्ताव शासनाकडे आहे. या कामाला गती देण्याची गरज आहे. हे पाणी अमरावती विभागात वळवण्यासाठी शासनाचे प्रयत्न आवश्यक आहेत.

प्रकल्पाच्या कामात गती :- विदर्भातील प्रकल्पाच्या कामास गती देण्याची गरज आहे. प्रशासकीय मान्यता देणे, भूसंपादन पुनर्वसन करणे रिक्त जागा भरणे, प्रकल्प पुर्ण करणे इत्यादी अडचणी दूर करणे आवश्यक आहे.

पर्याप्त निधीची आवश्यकता :- विदर्भातील ज्या प्रकाल्पातून पाणी वापर सुरू आहे त्या प्रकंल्पाचा निधी शासनाकडे जमा होतो. या निधीतुन कालवे, पाठचाऱ्या इत्यादी दुरूस्ती होणे गरजेचे आहे. जमा झालेला निधि विदर्भात कमी उपलब्ध होतो त्यामुळे प्रकल्पाची दुरूस्ती होत नाही. परिणामी पाण्याचा अपव्यव होतो. शेतकऱ्याचे नुकसान होते.

२०१७ मधील राज्यपालाचे निर्देश :- राज्यपाल विद्यासागर राव यांनी २०१७ मध्ये अनुशेष निर्मूलनाकरीता निर्देश दिले आहेत. यात विदर्भातील अमरावती विभागातील सिंचनाचा अनुशेष कायम असल्याबाबत स्पष्ट केले आहे. तसेच उर्वरित जिल्हयाचा अनुशेष दूर करता आलेला नाही. हा अनुशेष दूर करण्यासाठी ७५० कोटी रूपयाची तरतुद करण्याचे आदेश दिले आहेत.

Smt. Sindhutai Jadhav Maha Mohkar 330

VOLUME - VIII, ISSUE - 1 - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

विदर्भातील शेतकऱ्याच्या आत्महत्येची कारणे , परिणाम व उपाय

१९९० नंतर शेतकऱ्याच्या आत्महत्येत वाढ होत चालली आहे. देशातील काही राज्यामध्ये उदा. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, तेलगणा, कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, छत्तीसगड या राज्यात शेतकऱ्याच्या आत्महत्या मोठया प्रमाणात झाल्याचे दिसून येते. या संपुर्ण आत्महत्याचा अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, या आत्महत्या कापूस उत्पादकाच्या आहेत. महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्याच्या आत्महत्येची चर्चा २००० पासून सुरू झाली. महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्यामध्ये विदर्भात शेतकऱ्याच्या आत्महत्या जास्त प्रमाणात झाल्या आहेत. विदर्भात कापूस हे पीक जास्त प्रमाणात घेतल्या जाते. विदर्भातील शेती कोरडवाहू आहे. विदर्भात सिंचनाचे प्रमाण कमी आहे. विदर्भातील शेतीतील ८९ टक्के शेती कोरडवाहू आहे. ही कोरडवाहु शेती निसर्गाच्या पावसावर अवंलबून आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्याची शेती उत्पन्न कमी होत चालले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा निसर्गासोबत जुगार चाललाआहे. शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढत चालल्या आहेत.

या आत्महत्या बुलडाणा, अकोला, वाशिम, यवतामळ, वर्धा या जिल्हयात जास्त प्रमाणात घडवून येत आहेत. कारण या जिल्ह्यात कोरडवाहु शेतीचे प्रमाण जास्त आहे. आधुनिक काळात शेती करणे कठिण झाले आहे, शेती करण खर्चिक झाले आहे. या कारणामुळे देखिल शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढत चालल्या आहेत. शेती करीत असतांना सुधारित बियाणे, खत, फवारणी, यंत्राच्या आधारे शेती इ. साधनाचा वापर करावा लागतो. या पध्दतीने शेती करतांना बराच खर्च येतो. या उलट शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. उत्पन्न व खर्च याचा मेळ बसत नाही. यामुळे शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढत चालल्या आहेत. विदर्भात शेतकऱ्याच्या आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. हे शोधण्यासाठी अनेक संस्था व समित्यानी संशोधन केले. त्यांनी शेतकऱ्याच्या आत्महत्येची अनेक कारणे सांगितली आहेत.

आत्महत्या म्हणजे काय ?

कोणत्याही व्यक्तीने आपले जीवन कृत्रिमपणे संपविण्याच्या कृतीला आत्महत्या असे म्हणतात.व्यक्तीला अनेक समस्या असतात. या समस्या वाढत जातात. जीवन जगणे कठिण होवून जाते तेंव्हा व्यक्ती आत्महत्या करते. आत्महत्येचा अभ्यास सर्व प्रथम एमिल डरखाईम या समाजशास्त्रज्ञाने केला. त्यांने आत्महत्येचा सर्वांगीण अभ्यास केला. त्यांने असे स्पष्ट केले की, आत्महत्येला व्यक्ती जबाबदार नसुन समाज जबाबदार आहे. समाज व्यक्तीला आत्महत्येला बाध्य करतो. तसेच आत्महत्या ही एक मानसिक विकृती आहे. आपल्या समोर असलेली समस्या सोडविण्यापेक्षा व्यक्तीला आपले जीवन संपवावे वाटते. या पेक्षा व्यक्ताने समस्या सोडविणे गरजेचे आहे. आत्महत्या ही व्यक्तीची शेवटची समस्या आहे. आत्महत्येने व्यक्ती आपला नाश करून घेते. व्यक्ती स्वतःला संपविते. ही सर्वात ज्वलंत समस्या आहे. समाजात आत्महत्येचे प्रमाण वाढत चालले आहे.आत्महत्या कमी करण्यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे आहे.

Smt.Sindhutai Jadhav Maha Mehkar
330

Scanned by TapScanner

शेतकऱ्यांची मजूरी देखील निघत नाही. हा खर्च टाळता न येण्यासारखा आहे. हा खर्च करावाच लागतो. त्या तुलनेत शेतकऱ्याला उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे आत्महत्या वाढत चालल्या आहेत.

सिंचन सुविधेचा अभाव :- राज्यातील ८० टक्के शेती कोरडवाहू आहे. या शेतीत दोन पिके घेतली जात नाहीत. पाण्याअभावी उत्पादनात घट होते. शेतकऱ्याचे सिंचन वाढविण्यासाठी शासनाद्वारे अनेक योजना राबविल्या जातात. शेतकऱ्याला विहीर,पाईप लाईन दिली जाते. परिसरातील पाणी पातळी वाढण्यासाठी नदीवर बंधारे बांधले जातात. परंतु पावसाचे प्रमाण कमी होत असल्यामुळे त्याचा परिणाम शेतीवर होत आहे. जर बागायती शेतीत वाढ झाली तर आत्महत्या कमी होऊ शकतात.

निकृष्ठ प्रतिचे बियाणे :- अनेक कंपन्या निकृष्ठ प्रतिचे बि-बियाणे, खते, किटकनाशके निर्माण करतात. यांचा दर्जा योग्य नसतो. त्यामुळे शेतकऱ्याच्या उत्पादनात घट होते. शेतकऱ्याचे मोठया प्रमाणात नुकसान होते. शेतकऱ्याचा खर्च वाया जातो. या कंपण्याकडून शेतकऱ्याला नुकसान भरपाई मिळत नाही. अशा घटना शेतकऱ्याच्या बाबतीत दर वर्षी घडतात. शासन अशा कंपण्याना बंद करीत नाही .या कारणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत चालल्या आहे.

सततची नापिकी :- सततची नापिकी हे आत्महत्येचे मुख्य कारण आहे. राज्यात पावसाचे प्रमाण कमी होत चालले आहे. त्यामुळे शेतकऱ्याच्या उत्पादनात घट होत चालली आहे. हे काही एका वर्षाचे नाही दर वर्षी निसर्गाचा फटका शेतकऱ्याला बसत आहे. गेल्या तीन वर्षापासून राज्यातील लातुर, परभणी, सातारा, सांगली या जिल्हयात पाऊस पडत नाही दुष्काळग्रस्त जिल्हयाची संख्या वाढत चालली आहे. अनेक जिल्हयात पावसाअभावी पेरणी केली जात नाही. त्यामुळे शेतकऱ्याचा उदरनिर्वाह कसा चालवयाचा हा प्रश्न निर्माण होतो. यामुळे देखील शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढत आहेत.

नैसर्गीक आपत्ती :- शेतकऱ्याला पेरणीपासून माल विक्रीपर्यंत अनेक संकटाला समोर जावे लागते. यामध्ये प्रामुख्याने गारपिटी, अतिवृष्टी, पावसाचा लहरीपणा इत्यादीचा समावेश होतो. नैसर्गीक आपत्तीमुळे शेतकऱ्यांची नुकसान होते. बऱ्याच वेळा आलेले पीक वाया जाते, पीकाची नासाडी होते. सध्याच्या काळात दरवर्षी मार्च महिण्यात पाऊस पडत आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे रब्बी पीक धोक्यात आले आहे. याचाही परिणाम शेतकऱ्याच्या आत्महत्येवर होत आहे.

वाढता खर्च :- शेतकऱ्याचे उत्पादन घटत चालले आहे. तर त्याचा खर्च वाढत चालला आहे. अधुनिक काळात शेती करणे कठिण झाले आहे. शेती खर्चिक झाली आहे. त्यामुळे शेतीसह कुटंबाचा खर्च करणे शेतकऱ्याला शक्य होत नाही. शेतीच्या आधारावर कुटूंबाचा उदरनिर्वाह करणे कठिण आहे. शेतीच्या भरवशावर कुटूंबाचा खर्च पुर्ण करता येत नाही. या दृष्ट चक्रामुळे देखिल शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढत आहेत.

जोड धंदयाचा अभाव :- विदर्भातील शेतकरी पुर्णपणे शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे शेतकऱ्याची आत्महत्या वाढत चालली आहे. शेतीला पूरक असे व्यवसाय करणे गरजेचे आहे. उदा. दुग्ध व्यवसाय, कुक्कुट पालन, शेळी पालन, वराह पालन, इमु पालन, गांडुळ खत निर्मिती प्रकल्प इत्यादी व्यवसाय करणे गरजेचे आहे. या पध्दतीची शेती राज्यामध्ये केली जात नाही. राज्यात कोरडवाहु शेती जास्त प्रमाणात असल्यामुळे आत्महत्या वाढत चालल्या आहेत.

Scanned by TapScanner

वाढती महागाई :- शेतकऱ्यांच्या आत्महत्येला वाढती महागाई जबाबदार आहे. शेतकऱ्यांच्या शेतीचा खर्च वाढला आहे. मजुरीचे दर वाढले आहेत. त्याचबरोबर वाढत्या महागाईमुळे शेतकऱ्याचा खर्चा वाढत चालला आहे. तसेच शेतकऱ्याचा जीवन आवश्यक खर्च वाढत चालला आहे. बऱ्याच वेळा शेती मधुन नफा तर मिळतच नाही. परंतु शेतकऱ्यांनी केलेला खर्च देखिल निघत नाही. अशा प्रसंगी शेतकरी हातबल होऊन आत्महत्येचा मार्ग स्विकारतात.

शेतमालाला कमी भाव :- या विषयवर बोलतांना शेतकरी नेते चंद्रकांत वानखेडे, अमर हबीब, विजय जिल्लेकर, गजानन अहमदाबादकर म्हणतात की, एकतर शेतकऱ्याचे पिकत नाही ही शेतकऱ्याची समस्या असते. दुसरीकडे पिकले तर शेतकऱ्याची लूट होते. शेतमालाला भाव दिला जात नाही. पीक मातीमोल विकावे लागते. शेतकरी भाव मिळेपर्यंत थांबू शकत नाही. शेतकऱ्याचा माल खरेदी करून व्यापारी लोक लाखो रूपये मिळवितात. उत्पादन करणारा शेतकरी दारिद्र्यात जीवन जगतो. त्याचा जन्म दारिद्र्यात होतो व शेवट देखिल दारिद्र्यात होतो. शासन कोणतेही आले तरी ते शेतकरी विरोधी असते.

पर्यायी रोजगाराचा अभाव :- विदर्भातील शेती कोरडवाहू आहे. त्यामुळे या शेतीत एकच पीक घेतले जाते. सिंचन कमी असल्यामुळे या शेतीत जास्त लोक सामावून घेतले जात नाहीत. शेतीत पर्यायी रोजगार मिळत नाही. काम करणाऱ्या व्यक्तीला रोजगार मिळत नाही.लोक कामाच्या शोधात शहराकडे स्थलांतर करतात. पर्याय रोजगार मिळविण्याचा प्रयत्न करतात. हा रोजगार मिळत नाही तेंव्हा ते निराश होतात. त्यामुळे आत्महत्या वाढत आहेत.

विभक्ती कुटूंबपध्दती: भारतीय समाजात विभक्त कुटूंबपध्दती वाढत चालली आहे. या आगोदर समाजात सयुक्त कुटूंबपध्दती अस्तित्वात होती. या कुटूंबात व्यक्तीला जीवन जगताना एकाकी वाटत नव्हते. कुटूंबातील सदस्याना आधार वाटत होता. नव्या कुटूंबपध्दतीत एकटयाला आधार मिळत नसल्यामुळे आत्महत्या वाढत आहेत. कुटूंबाच्या विभाजनाबरोबर शेतीचे विभाजन देखिल होत आहे. प्रत्येक व्यक्तीच्या वाटयाला कमी शेती येत आहे. अल्पशेतीमध्ये कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठिण आहे.

शासनाचे धोरण :- सरकार कोणतेही असले तरी ते शेतकऱ्याला जाचक असते. सत्तेत येईपर्यंत संख्येने जास्त असलेल्या शेतकऱ्याला अनेक अश्वासने दिली जातात. त्याची पुर्तता नंतर केली जात नाही.शेतकऱ्यासाठी अनेक योजना जाहीर केल्या जातात या योजनेचा लाभ शेतकऱ्याला प्रत्यक्ष मिळत नाही. कारण त्याला योजनेची माहिती नसते.शेतकऱ्याच्या योजना कागदोपत्री राबविल्या जातात. त्यामुळे शेतकऱ्याच्या आत्महत्या वाढत चालल्या आहेत.

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना

शेतकऱ्यांना अनुदान :- शेतकऱ्याला वाढत्या महागाईमुळे शेती करणे कठीण झाले आहे. त्यासाठी त्याला बि-बियाणे, खते, किटकनाशके, सिंचन सुविधा यासाठी अनुदान देणे गरजेचे आहे. हे अनुदान देत असतांना शेतकऱ्यांला थेट मदत देणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांला तातत्काळ मदतीची गरज असते. पेरणी, मशागत करतांना शेतकऱ्यांला मदतीची गरज असते. या प्रसंगी मदत केल्यास त्याचा शेतकऱ्याला फायदा होईल.

330

Scanned by TapScanner

रास्त दराने कर्ज पुरवठा :- शेतकऱ्याला कर्जाची गरज आहे. सततच्या नापिकिमुळे तो वेळच्या वेळी कर्ज भरू शकत नाही. त्यासाठी त्याला कमी व्याज दराने कर्ज दिल्यास आत्महत्या कमी होवू शकतात. शेतकऱ्याला कर्ज परत करणे शक्य झाले नाही तर त्याला कर्जाचे पुर्नगठण करून देणे गरजेचे असते. यासाठी बँक अधिकाऱ्यांने शेतकऱ्याला माहिती देणे गरजेचे असते. या पध्दतीने कर्ज पुरवठा केल्यास आत्महत्या कमी होऊ शकतात.

उत्पादन खर्च अधिक पन्नास टक्के नफा :- शेतमालाला उत्पादन खर्च अधिक पन्नास टक्के नफा द्यावा असे कृषी शास्त्रज्ञ डॉ स्वामीनाथन यांनी सुचविले आहे. प्रत्यक्षात खर्च अधिक पन्नास टक्के नफा दिला जात नाही. सध्याच्या मोदी सरकाने निवडणुकीच्या वेळी शेतकऱ्याला उत्पादन खर्च अधिक पन्नास टक्के नफा दिला जाईल असे आश्वासन दिले होते. त्याची पुर्तता सरकारने केली नाही. त्यामुळे आत्महत्या वाढत चालल्या आहेत.

महागाईवर नियंत्रण :- सध्या महागाई वाढत चालली आहे. त्यामुळे शेती अधिक अवघड होत चालली आहे. यासाठी सर्व प्रथम शासनाने महागाईवर नियंत्रण प्रस्थापीत करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांचे उत्पादन कमी आहे. अल्प उत्पादनात शेतकरी आपल्या गरजा पूर्ण करून शकत नाही. घेतलेले कर्ज परत करू शकत नाही. याचे मुख्य कारण वाढती महागाई आहे. महागाईवर नियंत्रण प्रस्थापीत केल्यास आत्महत्या कमी होवू शकतात.

शेतीची मशागत :- शेतीची मशागत करण्यासाठी शेतकऱ्याला जास्त खर्च येतो. यासाठी शासनाने माहात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजना या आधारे शेतीची मशागत केल्यास शेतकऱ्याचा खर्च कमी होवू शकतो शेतकऱ्याला आधार मिळू शकतो.शासनाने शेतीचा काही खर्च दिल्यास शेतकऱ्याला मदत होऊ शकतो. शेतकरी समाज व्यवस्थेमध्ये टिकून राहु शकतो . या पध्दतीची मदत शेतकऱ्याला देणे गरजेचे आहे.

सिंचनात वाढ :- राज्यात व विदर्भात बागायती शेतीचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे उत्पादन घटत चालले आहे. यामध्ये वाढ करायची असेल तर सिंचनात वाढ करणे गरजेचे आहे. सिंचनात वाढ करण्यासाठी पाण्याचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. सिंचनाच्या पध्दती बदलने गरजेचे आहे. सिंचनाचे साधने बदलणे गरजेचे आहे. त्याच त्याच पध्दतीने सिंचन केल्यामुळे पाणी जास्त लागते. उत्पादन वाढत नाहीत. म्हणून नविन सिंचन पध्दती उदा. स्प्रिंकलर , ठिंबक इ.

नियमित वीज पूरवठा :- शेतकऱ्याला नियमीत मोफत वीज पुरवठा देणे गरजेचे आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे उत्पादन वाढते. सिंचनासाठी विज आवश्यक असते. शासनाने शेतकऱ्याला वीज पुरवठा योग्य वेळी केल्यास आत्महत्या कमी होवू शकतात. त्याच बरोबर शासनाने शेतकऱ्यांला मोफत वीज देणे गरजेचे आहे. कारण शेकऱ्याला सर्व ठिकाणी खर्च करणे शक्य होत नाही. शेकऱ्याला गरज असते. तेंव्हा वीज उपलब्ध करून दिल्यास आत्महत्या कमी होऊ शकतात.

प्रक्रिया उद्योग निर्मिती :- शेतकऱ्याच्या मालावर प्रक्रिया उद्योग भांडवलदाराचे आहेत. हे प्रक्रिया उद्योग शेतकऱ्यांनी चालविल्यास त्याला रोजगार मिळू शकतो. त्याच्या उत्पादनाला योग्य भाव मिळू शकतो. त्याच्या भांडवलात वाढ होवू शकते. या पध्दतीचे प्रक्रिया उद्योग स्थापन करण्यासाठी शेतकऱ्यांला आनुदान देणे गरजेचे आहे. या उद्योगाला शासनाने भांडवल उपलब्ध करून दिल्यास आत्महत्या कमी होऊ शकतात.

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana

शेतीपुरक व्यवसायाला अनुदान :- शेतील पुरक असलेले जोड व्यवसाय करण्यासाठी शेतकऱ्याला अनुदान मिळणे गरजेचे आहे. यासाठी त्याला सवलत देणे गरजेचे आहे. या योजना कोणत्या आहेत. याची माहिती शेतकऱ्याला कृषी विभागाने देणे गरजेचे आहे. असे केल्यास विदर्भातील शेतकऱ्याच्या आत्महत्या कमी होवू शकतात.

पिक विमा योजना :- शेतकऱ्याच्या आत्महत्या थांबविण्यासाठी शासनाने सर्व पिकांना पीक विमा योजना लागु करावी. हा विमा शासनाने भरावा. आपत्तीच्या प्रसंगी शासनाने विमा कंपन्यानी मदत दयावी. शासनाने दुष्काळ जाहिर केल्यास शेतकऱ्याला त्याचे नुकसान भरपाई देणे गरजेचे आहे. शेतकऱ्याला त्याच्या उत्पादनाच्या पन्नास टक्के रक्कम तरी मिळणे गरजेचे आहे. असे केल्यास आत्महत्या कमी होऊ शकतात

संदर्भसूची

- महाराष्ट्राची अर्थव्यवस्था -प्रा. डॉ. करणसिंग राजपुत , साईनाथ प्रकाशन , नागपूर . २०१६
- भारतातील आधुनिक वित्तीय व्यवस्थापन - प्रा. मुलाणी एम. यु. , सक्सेस प्रकाशन, पुणे. २०१८
- भारतातील सामाजिक समस्या - रा. ज. लोटे, पिंपळापुरे प्रकाशन, नागपुर. २०१६
- भारतातील सामाजिक समस्या - डॉ. प्रदिप आगलावे, साईनाथ प्रकाशन , नागपूर २०१८
- दै. सकाळ मधील लेख.

330

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar.Dist.Buldana

Scanned by TapScanner